29 OCT 2024
सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# डॉ. माणिकराव साळुंखे यांना जीवनगौरव

## इंडियन केमिकल सोसायटीकडून होणार सन्मान

सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २८ : शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. माणिकराव साळुंखे यांना इंडियन केमिकल सोसायटी या अग्रगण्य राष्ट्रीय संस्थेकडून सन २०२४ साठीचा जीवनगौरव पुरस्कार जाहीर झाला आहे. येत्या १९ ते २१ डिसेंबर २०२४ रोजी जयपूर येथे संस्थेचे वार्षिक अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे.

> रसायनशास्त्रात माझी सर्व कारकीर्द झाली आहे. त्यामुळे या क्षेत्रातील कामगिरीबद्दल इंडियन केमिकल सोसायटीने मला जाहीर केलेल्या जीवनगौरव पुरस्काराबद्दल खूप आनंद वाटत आहे.
> **- डॉ. माणिकराव साळुंखे**



त्या अधिवेशनात डॉ. साळुंखे यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे.

या पुरस्कारासह संस्थेची मानद आजीव फेलोशिपही त्यांना प्रदान करण्यात येणार आहे. डॉ. साळुंखे यांनी जयपूर येथील राजस्थान केंद्रीय विद्यापीठासह देशातील पाच विविध विद्यापीठांचे कुलगुरूपद भूषविले आहे. डॉ. साळुंखे यांनी रसायनशास्त्र, रसायन अभियांत्रिकीसह संबंधित उद्योगांमध्ये आपल्या संशोधनाच्या माध्यमातून मौलिक योगदान देऊन आपल्या कार्याचा स्वतंत्र ठसा उमटविला आहे. त्यांच्या या कार्याचा संस्थेच्या शतक महोत्सवानिमित्त जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करताना संस्थेला अभिमान वाटत आहे, असे सोसायटीचे अध्यक्ष प्रा. जी. डी. यादव यांनी डॉ. साळुंखे यांना पाठविलेल्या पत्रात म्हटले आहे.

29 OCT 2021
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंडियन कॉमर्स असोसिएशनतर्फे डॉ. श्रीकृष्ण महाजन यांचा सन्मान

**कोल्हापूर, ता. २८ :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना त्यांच्या वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील योगदानाबद्दल इंडियन कॉमर्स असोसिएशनने फेलो म्हणून सन्मानित केले आहे.

उदयपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या ७५ व्या अखिल भारतीय वाणिज्य परिषदेत गुरू गोविंद जनजातीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. के. माथूर यांच्या हस्ते प्रा. महाजन यांचा सन्मान करण्यात आला. त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात वाणिज्य व व्यवस्थापन विषयामध्ये केलेले अध्ययन, अध्यापन, संशोधन व विस्तारकार्य याबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे. प्रा. महाजन यांनी अकौंटन्सी व फायनान्स या विषयांचे अध्यापन केले आहे. अकौंटन्सी, फायनान्स, उद्योजकता विकास, काजू प्रक्रिया व अन्न प्रक्रिया उद्योग, ग्रामीण व्यवस्थापन या विषयांवर संशोधन केले आहे. सध्या ते विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य आहेत.



डॉ. महाजन

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 OCT 2024
लोकमत

# श्रीकृष्ण महाजन 'फेलो'ने सन्मानित

लोकमत न्यूज नेटवर्क



**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा. डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना त्यांच्या वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील योगदानाबद्दल इंडियन कॉमर्स असोसिएशनने फेलो म्हणून सन्मानित केले.

उदयपूर येथे नुकत्याच पार पडलेल्या ७५ व्या अखिल भारतीय वाणिज्य परिषदेत गुरू गोविंद जनजातीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. के. माथूर यांच्या हस्ते प्रा. महाजन यांचा सन्मान करण्यात आला. त्यांनी उच्च शिक्षण क्षेत्रात वाणिज्य व व्यवस्थापन विषयामध्ये केलेले अध्ययन, अध्यापन, संशोधन व विस्तारकार्य याबद्दल त्यांना गौरविण्यात आले आहे.

प्रा. महाजन यांनी अकौंटन्सी व फायनान्स या विषयांचे अध्यापन केले आहे. अकौंटन्सी, फायनान्स, उद्योजकता विकास, काजू प्रक्रिया व अन्न प्रक्रिया उद्योग, ग्रामीण व्यवस्थापन या विषयांवर संशोधन केले आहे.

जनसंपर्क कक्ष
29 OCT 2024 शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# इंडियन कॉमर्स असो. कडून डॉ. महाजन यांचा सन्मान

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखेचे अधिष्ठाता प्रा.डॉ. श्रीकृष्ण महाजन यांना वाणिज्य व व्यवस्थापन क्षेत्रातील योगदानाबद्दल इंडियन कॉमर्स असोसिएशनने फेलो म्हणून सन्मानित केले आहे. उदयपूर येथे झालेल्या ७५ व्या अखिल भारतीय वाणिज्य परिषदेत गुरू गोविंद जनजातीय विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. व्ही. के. माथूर यांच्या हस्ते त्यांचा सन्मान करण्यात आला.



डॉ. श्रीकृष्ण महाजन

प्रा. महाजन यांनी अकौंटन्सी व फायनान्स या विषयांचे अध्यापन केले आहे. अकौंटन्सी, फायनान्स, उद्योजकता विकास, काजू प्रक्रिया व अन्न प्रक्रिया उद्योग, ग्रामीण व्यवस्थापन या विषयांवर संशोधन केले आहे. विद्यापीठ अनुदान आयोग, भारतीय सामाजिक विज्ञान अनुसंधान परिषद, तसेच शिक्षण मंत्रालयाच्या इम्प्रेस या योजनेचे अनुदान त्यांच्या संशोधन प्रकल्पांना प्राप्त झाले. वीस विद्यार्थ्यांनी त्यांच्या मार्गदर्शनाखाली पीएच.डी.चे संशोधन पूर्ण केले आहे. ते विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य असून, विद्यापीठाच्या वाणिज्य व व्यवस्थापन अधिविभागाचे विभागप्रमुख म्हणून त्यांनी अकरा वर्षे काम पाहिले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 OCT 2024
लोकमत

# वसतिगृहासाठी पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाखांचा निधी

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या प्रस्तावित लोकस्मृती विद्यार्थिनी वसतिगृहासाठी विद्यापीठातील माजी प्राध्यापक डॉ. आर. के. पुरी यांच्या स्मरणार्थ पाच लाख रुपयांच्या निधीचा धनादेश त्यांच्या पत्नी प्रा. विजया पुरी यांनी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांच्याकडे सुपुर्द केला.

या माध्यमातून विद्यापीठाच्या परिसरात डॉ. पुरी यांच्या स्मृती चिरंतन राहतील, अशी भावना डॉ. विजया पुरी यांनी व्यक्त केली. कुलगुरू डॉ. शिर्के यांनी त्याबद्दल त्यांचे स्वागत केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, डॉ. जे. बी. यादव उपस्थित होते.

29 OCT 2024 लोकमत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# सर्वच मगरी धोकादायक नसतात, त्यांचे अस्तित्व महत्त्वाचे

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** सर्वच मगरी धोकादायक नसतात, त्यांचे अस्तित्व महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन गोवा येथील कॅरमल कॉलेज फॉर वूमनचे प्राणिशास्त्र विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. मनोज बोरकर यांनी केले.

शिवाजी विद्यापीठाच्या प्राणिशास्त्र अधिविभागात आयोजित शिवाजी विद्यापीठाचे माजी कुलगुरू डॉ. आप्पासाहेब तानसेन वरुटे स्मृती व्याख्यानमालेत त्यांनी शुक्रवारी क्रॉक्स ऑन द रॉक्स या विषयावर १६ वे पुष्प गुंफले. त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी शिवाजी विद्यापीठाच्या विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा अधिष्ठाता डॉ. सरिता ठकार होत्या.

ते म्हणाले, पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी मगरींचे संवर्धन करणे गरजेचे आहे. भारतात आढळणाऱ्या मगरींच्या विविध प्रजाती, त्यांचे अधिवास, त्यांची वर्तणूक, याबद्दल त्यांनी यावेळी सविस्तर माहिती दिली. मगरी नेहमी माणसांवर हल्ला करत नाहीत असे सांगून माणसावर हल्ला



करणाऱ्या मगरींच्या प्रजाती त्यांनी सांगितल्या. मगरींचा अधिवास हळूहळू नष्ट होण्याची कारणे त्यांनी सांगितली. पुराणामध्ये मगरींचे खूप महत्त्व आहे हे सांगताना त्यांनी मगरींचे पर्यावरणातील महत्त्व अधोरेखित केले. मगर आणि इतर प्राण्यांचा संवर्धनासाठी आणखी प्रयत्न करणे खूप गरजेचे आहे, असे आवाहन त्यांनी केले.

व्याख्यानमालेचे समन्वयक डॉ. एस. एम. गायकवाड यांनी प्रास्ताविक केले. विभागप्रमुख डॉ. एस. आर. यंकंची यांनी परिचय करून दिली. डॉ. एम. व्ही. वाळवेकर यांनी आभार मानले. यावेळी डॉ. ए. ए. देशमुख, डॉ. एन. ए. कांबळे, डॉ. एम. पी. भिलावे, डॉ. ए. डी. गोफणे उपस्थित होते.

29 OCT 2024
पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# भूस्खलनप्रवण क्षेत्रातील जैवविविधतेचे होणार संशोधन!

## शिवाजी विद्यापीठास 'हिसोआ'कडून शास्त्रीय उपकरण मंजूर

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा



डॉ. निंबाळकर

शिवाजी विद्यापीठामध्ये भूस्खलनप्रवण क्षेत्रातील जैवविविधतेच्या अनुषंगाने सुरू असलेल्या संशोधन प्रकल्पास पुण्यातील 'हिसोआ' अग्रगण्य मोबाईल कंपनीकडून औद्योगिक सामाजिक दायित्वांतर्गत (सीएसआर) निधीतून शास्त्रीय उपकरण मंजूर झाले आहे.

विद्यापीठातील वनस्पतीशास्त्रज्ञ डॉ. मानसिंगराज निंबाळकर यांना पुण्याच्या ऊर्मी संस्थेकडून २०२४-२५ साठी 'कोल्हापूर परिसरातील घाटातील भूस्खलनप्रवण क्षेत्रातील जैवविविधतेचा शास्त्रीय अभ्यास' हा महत्त्वाचा संशोधन प्रकल्प मंजूर झाला आहे. संशोधन प्रकल्पासाठी पुणे येथील मोबाईल क्षेत्रातील अग्रणी कंपनी हिसोआ इलेक्ट्रॉनिक यांच्या 'सीएसआर' निधीअंतर्गत मल्टिमोडल रीडर उपकरण मंजूर झाले आहे.

उपकरणाच्या सहाय्याने एकाचवेळी विविध ९६ नमुन्यांची चाचणी करणे शक्य होणार आहे. ॲबसॉर्बन्स फ्लुओरेसन्स व ल्युमिनसन्स यांच्यासह इतर घटक मोजण्याची क्षमता उपकरणात आहे. वनस्पतींची मुळे व जमीन यांच्यातील संबंधांचा भूस्खलनाच्या अनुषंगाने अभ्यास करण्यासाठी उपकरणाची मदत होणार आहे.

भूस्खलनाची जोखीम कमी करण्यासाठी उपयुक्त असलेल्या वनस्पतींच्या प्रजाती ओळखण्यासाठी संशोधन उपयुक्त ठरेल. भूस्खलनानंतर जमिनीचा उतार दुरुस्त करण्याच्या उपाययोजनांमध्ये त्याचा उपयोग होईल, असे डॉ. निंबाळकर यांनी सांगितले.

### अणुस्कुरा, करूळ व फोंडा घाट रस्त्यांचा अभ्यास होणार

प्रकल्पांतर्गत कोल्हापूर ते कोकणाला जोडणाऱ्या पश्चिम घाटातील अणुस्कुरा, करूळ व फोंडा या तीन प्रमुख घाटरस्त्यांचा भूस्खलनाच्या संदर्भात अभ्यास केला जाणार आहे. कोणती झाडे उतारांना स्थिर करतात व मुळांच्या माध्यमातून मातीची धूप रोखतात, हे समजून घेण्यासाठी हा अभ्यास उपयुक्त ठरणार आहे.

29 OCT 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# विद्यार्थ्यांच्या सेवाभावातून दिवाळी झाली गोड

## 'चेतना'च्या उत्पादनांची ४ दिवसांत ४२ हजारांची विक्री; एमबीएच्या विद्यार्थ्यांचे सहकार्य

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

बौद्धिक अक्षम मुलांसाठी कार्यरत असलेल्या चेतना अपंगमती विकास संस्थेच्या चेतना उत्पादन केंद्रातील मुलांनी दिवाळीनिमित्त तयार केलेल्या विविध उत्पादनांच्या विक्रीसाठी शिवाजी विद्यापीठ एमबीएच्या विद्यार्थ्यांनी विपणन व विक्री कौशल्यांचे सहाय्य पुरविले. अवघ्या चार दिवसांत ४२ हजार रुपयांच्या वस्तूंची विक्री करण्यात यश मिळविले. विद्यार्थ्यांच्या सेवाभावातून अनेकांची दिवाळी गोड झाली आहे.

एम.बी.ए. अधिविभागातील विद्यार्थ्यांनी समाजाभिमुख उपक्रमांतर्गत चेतना अपंगमती विकास संस्थेसोबत उपक्रम राबवला. 'चेतना उत्पादन केंद्र' यांच्या उत्पादनांचा प्रचार करणे आणि विक्री वाढविणे हा उद्देश होता. दिवाळीच्या निमित्ताने चेतना संस्थेच्या विद्यार्थ्यांनी 'चेतना स्पेशल गिफ्ट बॉक्स', आकर्षक पणत्या व आकाशकंदील, उटणे, साबण आदी विविध उत्पादने तयार करून विक्रीसाठी उपलब्ध केली.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एमबीएच्या विद्यार्थ्यांनी शिवबाजार येथे मांडलेल्या 'चेतना'च्या उत्पादन विक्रीच्या स्टॉलला विद्यार्थ्यांसह ग्राहकांचा प्रतिसाद मिळाला. (छाया : नाज ट्रेनर)**

एमबीएच्या विद्यार्थ्यांनी हा उपक्रम ना नफा, ना तोटा या तत्त्वावर राबविल्याने त्यांचे व्यवस्थापन कौशल्य सेवाभावी कार्यासाठी उपयोगी ठरले. उपक्रमासाठी विद्यार्थ्यांना एम.बी.ए. अधिविभागाच्या संचालक डॉ. दीपा इंगवले यांचे मार्गदर्शन लाभले. डॉ. तेजश्री घोडके, जयश्री लोखंडे, डॉ. परशराम देवळी आणि प्रशासकीय कर्मचारी यांचे सहकार्य लाभले.

2 9 OCT 2024
जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# एमबीए विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची 'चेतना'च्या उपक्रमाला जोड

## मुलांची दिवाळी गोड; ४२ हजारांच्या वस्तूंची विक्री

कोल्हापूर, ता. २८ : समाजातील सक्षम नागरिकांनी अक्षम नागरिकांना सहकार्याचा हात पुढे केला, तर सामाजिक-आर्थिक विषमता दूर होण्याबरोबरच सामाजिक सौहार्द प्रस्थापित होण्यासही मदत होते, याचे उदाहरण शिवाजी विद्यापीठाच्या एमबीए अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी दाखवून दिले. त्यांनी चेतना अपंगमती विकास संस्थेच्या मुलांनी दिवाळीनिमित्त तयार केलेल्या विविध उत्पादनांच्या विक्रीसाठी आपल्या विपणन, विक्री कौशल्यांचे सहाय्य पुरविले. त्याने चार दिवसांत ४२ हजार रुपयांच्या वस्तूंची विक्री झाली.

या उपक्रमाचा उद्देश चेतना उत्पादन केंद्राच्या उत्पादनांचा प्रचार करणे आणि विक्री वाढविणे होता. संस्थेत सध्या २२० विद्यार्थी असून, विविध स्वरूपाच्या शिक्षण आणि पुनर्वसनात्मक उपक्रमातून त्यांच्या सर्वांगीण विकासासाठी प्रयत्न केले जातात. यंदा 'चेतना'च्या या उपक्रमाला एमबीए अधिविभागाच्या विद्यार्थ्यांच्या कौशल्यांची जोड मिळाली. सध्या दिवाळीनिमित्त चेतना संस्थेच्या मुलांनी स्पेशल गिफ्ट बॉक्स, आकर्षक पणत्या व आकाशकंदील, उटणे, साबण, धूप-अगरबत्ती, लक्ष्मीपूजन पुडा, सुवासिक अभ्यंग तेल आदी विविध उत्पादने तयार करून विक्रीसाठी उपलब्ध केली. एमबीएच्या विद्यार्थ्यांनी ही उत्पादने, वस्तू विक्रीसाठी २१ ऑक्टोबरपासून विद्यापीठाच्या शिवबाजार, हॉटेल के-स्क्वेअरजवळील स्थानक आणि जिल्हा परिषद मैदान येथे ठेवली.

या वस्तूंची प्रभावीपणे विक्री करण्यासाठी विद्यार्थ्यांनी व्यावसायिक पद्धतीने विक्री योजना आखून डिजिटल मार्केटिंगही केले. परिणामी, अवघ्या चार दिवसांत एकूण ४२ हजार रुपयांच्या उत्पादनांची विक्री झाली. त्यांना एमबीए अधिविभागाच्या संचालक डॉ. दीपा इंगवले, तेजश्री घोडके, जयश्री लोखंडे, परशराम देवळी यांचे सहकार्य लाभले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या एमबीएच्या विद्यार्थ्यांनी 'चेतना'च्या उत्पादनांच्या विक्रीचा स्टॉल जिल्हा परिषद आवारात लावला. त्याला मुख्य कार्यकारी अधिकारी एस. कार्तिकेयन यांनी सहकाऱ्यांसह सदिच्छा भेट दिली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
29 OCT 2024
पुढारी

# जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास शिवाजी विद्यापीठाच्या विधी विद्यार्थ्यांची भेट

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विधी अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी जिल्हा विधी सेवा प्राधिकरणास भेट देऊन अनेक विषयांवर चर्चा केली.

विधी सेवा प्राधिकरण कार्याची सविस्तर माहिती देऊन न्यायालयीन वाद तडजोड व आपापसांत मिटवण्यासाठी प्रयत्न केले पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा विधी सेवा प्राधिकरणाचे सचिव सुधीर इंगळे यांनी केले. ॲड. गुरुप्रसाद माळकर यांनी मार्गदर्शन केले. प्रास्ताविक ॲड. प्रमोद दाभाडे यांनी केले. शिवाजी विद्यापीठाचे विधी अधिविभाग प्रमुख विवेक धुपदाळे यांनी आभार मानले. यावेळी प्रियंका जाधवर, ॲड. सुवर्णा शिवाजी कांबळे, ॲड. सागर कांबळे, ॲड. लक्ष्मी कांबळे, ॲड. दीपाली कमलाकर, ॲड. पृथ्वीराज चव्हाण, ॲड. स्वाती खाडे, ॲड. समिना मुल्ला, ॲड. सुचित्रा पाटील आदी उपस्थित होते.

2 9 OCT 2024

जनसंपर्क कक्ष
सकाळ शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# जिद्द, चिकाटी करिअरसाठी महत्त्वाचे

## डॉ. ककडे : डांगे महाविद्यालयात कार्यशाळा

कबनूर, ता. २८ : नियोजन, जिद्द, चिकाटी, आत्मविश्वास व कठोर परिश्रम हे करिअरसाठी महत्त्वाचे आहे, असे प्रतिपादन डॉ. विजय ककडे यांनी केले.

हातकणंगले येथील अण्णासाहेब डांगे महाविद्यालयात 'विपणन क्षेत्रातील करिअर संधी' या विषयावरील दोनदिवसीय कार्यशाळेत ते मार्गदर्शन करत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. निरंजन कुलकर्णी होते. सुवर्णा सूर्यवंशी यांनी मार्गदर्शन केले. कार्यशाळेमध्ये आर्थिक नियोजन, गुंतवणूक, मार्केटिंग सिक्युरिटीमध्ये प्लेसमेंटच्या संधी आदींबाबत मार्गदर्शन तसेच प्रशिक्षण दिले. डॉ. आप्पासाहेब शेळके, डॉ. सुनीता तेलसिंगे, डॉ. अमोल महाजन आदी उपस्थित होते. प्रा. डॉ. वंदना तांदळे यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. प्रा. डॉ. अशोक जाधव यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. सुकन्या कांबळे यांनी सूत्रसंचालन, डॉ. विजय डोंगरे यांनी आभार मानले.

2 9 OCT 2024 पुढारी
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# पदवीस्तरावरील परीक्षा २६ नोव्हेंबरपासून सुरू

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या वतीने ऑक्टोबर-२०२४ मधील कला, वाणिज्य, विज्ञान या पारंपरिक अभ्यासक्रमांच्या पदवीस्तरावरील परीक्षा दि. २६ नोव्हेंबरपासून सुरू होणार आहेत. ऑक्टोबर-नोव्हेंबर हिवाळी सत्रात सुरू होणाऱ्या परीक्षांच्या सुधारित प्रारंभ तारखा जाहीर करण्यात आल्या आहेत. डिप्लोमा, पी. जी. डिप्लोमा, सर्टिफिकेट अभ्यासक्रमासाठी प्रवेश घेणारे विद्यार्थी हे इतर अभ्यासक्रमास प्रवेश घेतात. त्यामुळे या अभ्यासक्रमांच्या परीक्षा १२ नोव्हेंबरपासून सुरू करण्यात येणार आहेत. कला, वाणिज्य, विज्ञान पारंपरिक पदव्युतर अभ्यासक्रमांच्या परीक्षा ४ डिसेंबरपासून सुरू होतील. पारंपरिक तसेच व्यावसायिक अभ्यासक्रमांचे सविस्तर वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.